# मनपाच्या दक्षता समितीने केली जाहीरात दरपत्रकाची यादी सादर करण्याची सूचना

## नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई



अधिकाऱ्यांशी चर्चा करताना सहायक आयुक्त चौहान

***नगर प्रतिनिधी*** / ११ सप्टेंबर

**अमरावती** : मध्यझोन कार्यक्षेत्रात लावण्यात येणाऱ्या जाहीरात होर्ल्डींगबाबत दक्षता समितीची बैठक सहायक आयुक्त श्रीकांतसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत जाहीरात कराबाबतचे सविस्तर दरपत्रक यादी सादर करण्याचे समिती अध्यक्ष यांनी नोडल अधिकारी यांना सुचविले. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मध्यझोन क्रमांक २च्या कार्यक्षेत्रात लावण्यात येणारे अनधिकृत जाहीरात होर्ल्डींगची यादी बाजार व परवाना विभागाने सादर करण्याची सुचविले. जाहीरात कराबाबतची सविस्तर दरपत्रक यादी उपलब्ध करून देण्याबाबत सुचना केल्या. कारवाई न झाल्यास प्रिंट करणारे व्यावसायीक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे यावेळी ठरविण्यात आले. बैठकीला रवी इंगळे, अमित मोतीवाला, आर.एन.वाकपांजर, बाजार परवाना विभागाचे प्रमोद मोहोड यांची उपस्थिती होती.


**भाड्याने / विक्रीस**

**महादेवकृष्ण अपार्टमेंटस्**
विनयविला मंगल कार्यालयासमोर,
शेगांव- रहाटगाव रोड, अमरावती
**रेडी पझेशन No GST**
**1&2BHK, FLATS, SHOPS**
**म.न.पा., ओ.सी., ६/२ प्राप्त**
सर्व सोयीयुक्त
पंतप्रधान आवास योजना, गृहकर्ज
सुविधा उपलब्ध
**संपर्क : 9552559947**
टोंगसे & पाटील इंजिनिअर्स


Scanned by CamScanner

# अनाधिकृत विज्ञापन मामलों में कार्रवाई को लेकर मंथन



## » मनपा के जोन क्र. 2 के लिए हुई बैठक

**शहर प्रतिनिधि | अमरावती**

जोन क्र. 2 अंतर्गत क्षेत्र में लगाए जाने वाले अनधिकृत विज्ञापन, फलक व होर्डिंग्स को लेकर दक्षता समिति की बैठक सोमवार को जोन कार्यालय में आयोजित की गयी। इस समय दक्षता समिति के अध्यक्ष व सहायक आयुक्त श्रीकांतसिंह चव्हाण, सदस्य रवि इंगले, अमित मोतीवाला, आर. एन. वाकपांजर, प्रमोद मोहोड़ मौजूद थे।

बैठक में रवि इंगले ने उच्च न्यायालय के निर्देशानुसार मध्य जोन अंतर्गत लगाए जाने वाले अनधिकृत विज्ञापन, फलक, होर्डिंग्स की सूची बाजार परवाना विभाग को प्रस्तुत करने की सूचना दी। साथ ही विज्ञापन हेतु विस्तृत दरपत्रक की सूची उपलब्ध करवाने शेष | पेज 14 पर

दै. भास्कर

# दिनांक 11/09/2018 रोजीचे अनधिकृत जाहिरात / फलक / होर्डींग्स बाबत. गठीत दक्षता समितीचे बैठकीचा कार्यवृत्तांत

मध्य झोन क्र.2 चे कार्यालयात आज दि. 11/09/2018 रोजी मध्य झोन कार्यक्षेत्रात लावण्यात येणारे अनधिकृत जाहिरात / फलक / होर्डींग्स बाबत. गठीत दक्षता समितीची बैठक दक्षता समितीचे अध्यक्ष तथा सहा. आयुक्त श्री. श्रीकांतसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेत पार पडले. सदर सभेला दक्षता समितीचे सदस्य श्री. रवि इंगळे, श्री. अमित मोतीवाला, श्री. आर.एन.वाकपांजर, नोडल अधिकारी, बाजार व परवाना विभाग, श्री. प्रमोद मोहोड, क.लि. जनसंपर्क विभाग, मनपा अम.हे हजर होते.

सर्वप्रथम उपस्थितांचे स्वागत करण्यात येवुन बैठकीचे प्रयोजनाबाबत माहिती देण्यात आली. मा. रवि इंगळे यांनी मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार मध्य झोन क्र.2 चे कार्यक्षेत्रात लावण्यात येणारे अनधिकृत जाहिरात / फलक / होर्डींग्स यांची यादी बाजार व परवाना विभागाने सादर करणेबाबत सुचविले. तसेच जाहिरात करावबाबतची सविस्तर दरपत्रक यादी उपलब्ध करुन देणेबाबत सुचविले तसेच झोन क्षेत्रात लावण्यात येणारे अनधिकृत जाहिरात / फलक / होर्डींग्स प्रिंट करणारे व्यवसायी व लावणारे यांना सुचना देवुन जाहिरात प्रिंट करणारे जाहिरातदार यांची यादी सादर करणेबाबत तसेच उपरोक्त नुसार कारवाई न झाल्यास प्रिंट करणारे व्यवसायी यांच्यावर कारवाई करण्याची सुचविले. मा. अमित मोतीवाला यांनी रोडवरील डिव्हायडर्स वर लागणा-या जाहिरातीबाबत माहिती विचारली असता नोडल अधिकारी यांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सद्यस्थितीत कोणताही कर वसुल केला जात नसल्याचे सांगितले. श्री. नोडल अधिकारी यांनी बाजार व परवाना विभागाचे जाहिरातकर हे उत्पन्नाचे स्त्रोत असल्याने प्रत्येक झोन निहाय नोडल अधिकारी नियुक्त केल्यास ते आपले कार्यक्षेत्रात तपासणी करुन अहवाल सादर केल्यास अनधिकृत जाहिरात / फलक / होर्डींग्स काढण्याची यंत्रणा तत्परतेने उपलब्ध करुन कार्यवाही करता येवु शकते. तसेच अनधिकृत जाहिरातदारांवर दंडात्मक कारवाई प्रस्तावित करता येवु शकेल असे सुचविले. पुढील सभेला अनधिकृत जाहिरात / फलक / होर्डींग्स जााहिरात कराबाबतची सविस्तर दरपत्रक यादी सादर करण्याचे समिती अध्यक्ष यांनी नोडल अधिकारी यांना सुचविले.

दक्षता समिती अध्यक्ष तथा सहा. आयुक्त अनधिकृत जाहिरात, मध्य झोन यांचेमार्फत सर्व उपस्थितांचे आभार मानुन सभा स्थगीत करण्यात आली.

—स्वा—

(श्रीकांतसिंह चौहान)
सहा.आयुक्त
तथा अध्यक्ष
मध्य झोन क्र.2, मनपा,अमरावती

OLC
[signature] 11/9/18
जनसंपर्क विभाग

[signature]
मध्य झोन क्र.2

Scanned by CamScanner